दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते दिनांक १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ४८ व नव्याने स्थापित सुमारे १७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुकाकरीता मतदार यादीचा कार्यक्रम ....

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र. ०८/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २६ जुलै, २०१९

प्रति,
जिल्हाधिकारी *(सर्व),*
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :-** दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ४८ व नव्याने स्थापित सुमारे १७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुकाकरीता मतदार यादीचा कार्यक्रम ....

**संदर्भ :-** आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.०६/का.०८, दिनांक २८ मे,२०१९ चे प्रभाग रचना व आरक्षणाचे आदेश व समक्रमांकाचे दिनांक २५/०७/२०१९ चे सुधारीत आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची असल्याने, आयोगाने दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ४८ व नव्याने स्थापित सुमारे १७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुका घेण्यासाठी आयोगाच्या दिनांक २६/०७/२०१९ च्या अधिसूचनेन्वये बुधवार दिनांक १०/०४/२०१९ हा मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक अधिसूचित करण्यात आला आहे.

२. **सदर निवडणुकांसाठी संगणक प्रणाली व्दारे मतदार यादी तयार करणे शक्य नसल्यास पारंपारिक पध्दतीने मुद्दा क्र. ६ नुसार प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.**

## आदेश

३. मतदार यादी कार्यक्रमाची व्याप्ती -

दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ४८ व नव्याने स्थापित सुमारे १७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुका घेण्यासाठी दिनांक १०/०४/२०१९ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी वापरण्यात यावी.

प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर त्या ग्रामपंचायतीच्या नावासह (मराठी/इंग्रजी) प्रसिध्दी अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे तात्काळ न चुकता सादर करण्यात यावा.

४. वरील मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील .

| | | |
|---|---|---|
| **मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक** | **बुधवार** | **दि.१०/०४/२०१९** |
| १) प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार | दि.२९/०७/२०१९ |
| २) हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | सोमवार<br>बुधवार | दि.२९/०७/२०१९ ते<br>दि. ३१/०७/२०१९ पर्यंत |
| ३) प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | गुरुवार | दि.०१/०८/२०१९ |

५. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे -**

प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी.

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींचा समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या अधिक त्या ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे (म्हणजेच संबंधित ग्रामपंचायतींतील विधानसभेच्या मतदार यादीत समाविष्ट असलेले सर्व मतदार त्या ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांसाठीच्या प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत तसेच, संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीबाहेरील मतदार त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत) याची खात्री करावी.

आ) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र. मनपा/रानिआ२००७/ प्र.क्र.०६/ का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

इ) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्रमांक - रानिआ/ मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दि. ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ई) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यांमधील दुरूस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दि.१७/०४/२०१५ चे आदेश)

६. **प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे.**

प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार/नागरीकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारुप मतदार यादीला दि.२९/०७/२०१९ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी .

७. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे.**

७.१ दि.२९/०७/२०१९ ते दि.३१/०७/२०१९ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करून प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त पुढीलप्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करता येईल:-

(i) लेखनिकांच्या काही चुका

(ii) दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार

(i) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करणे.

७.२ सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर वरीलप्रमाणे विचार करून त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात ,जेणेकरून पुढील काळात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत.

८. **प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे:**

अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना दिनांक ०१/०८/२०१९ रोजी मुद्दा क्र.९ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

९. प्रारूप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

अ) ग्रामपंचायत, तलाठी सजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील सूचना फलकावर

ब) स्थानिक वृत्तपत्रे

क) स्थानिक टेबल टि. व्ही.

१०. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या **मतदार यादीचे ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.** (संदर्भ: शासनाच्या महसूल व वन विभागाचे दि.२४/०४/२०१७ रोजीचे परिपत्रक)

११. मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींबाबत न्यायालयाने अथवा **अनर्हते विरोधातील अपिलासंदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास** त्या ठिकाणचा मतदार यादी कार्यक्रम रद्द करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१२. मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्ह्याच्या **मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने**

आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा. आपल्या कामाचा काढावा मा. आयुक्त यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी घेण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

१३. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१४. सदर प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सोबत: परिशिष्ट**

**प्रत:-**

१. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

३. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

४. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता घ्यावी.**

६. संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

७. कक्ष अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

८. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

९. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१०. निवड नस्ती.

(परिशिष्ट)

*आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र. ०८/का-८,दि. २६ जुलै,२०१९ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.*

दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ४८ व नव्याने स्थापित सुमारे १७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुकाकरिता मतदार यादीचा कार्यक्रम...

## मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक १०/०४/२०१९

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार दि.२९/०७/२०१९ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | सोमवार दि.२९/०७/२०१९ ते<br>बुधवार दि.३१/०७/२०१९ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | गुरुवार दि. ०१/०८/२०१९ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र